**South bound flyover at Andheri-Ghatkopar Junction on EEH open for traffic from today**

Mumbai

November 9, 2020

The newly built South bound flyover at Andheri-Ghatkopar Junction on Eastern Express Highway (EEH) was inaugurated by Honorable Minister Shri Aditya Thackeray, Minister Shri Eknath Shinde in presence of Member of Parliament, Legislator, corporators and Mumbai Metropolitan Commissioner, MMRDA RA Rajeev on Monday. The 12 metre wide flyover was proposed to reduce congestion on this existing junction and to separate traffic moving towards Mumbai and Ghatkopar.

Commuters moving from Mumbai to Thane was having three lane flyover however they had to face immense traffic jam on Andheri -Ghatkopar Junction. Therefore, to resolve traffic misery, the MMRDA had initiated the construction work of three lane new flyover (towards Mumbai).Now as the newly built flyover is open for traffic from today onwards, commuters can experience smooth and safe driving in both the directions. It will give better connectivity from Thane to Mumbai.

The work of flyover was awarded to M/s SMC Infrastructure Pvt. Ltd. and M/s Kashec Engineers Pvt. Ltd at total tender cost of Rs 33.04 crore. The overall width of the flyover is 12 metres and length is 693 metres. The flyover superstructure has steel girder, RCC slab and typical span of PSC-1 girder with RCC deckslab obligatory span in composite. According to the MMRDA, through this project total 30,036 man days of employment generated for skilled labourers and 36,875 man days for unskilled labourers. Approximately Rs 12.8 crore money spent on wages given to employees through this project alone.

Metropolitan Commissioner, MMRDA R A Rajeev said, "With this flyover getting open today, MMRDA adds one more contribution in transportation field to this great City. The existing Andheri Ghatkopar Link Road Junction was one of the busiest spot on EEH. Now with this new flyover the traffic will be divided subsequently reducing congestion on road."

He further added, "this flyover will be widely used on daily basis and would come as a relief for motorists as it is expected to reduce traffic congestion to a greater extent. The 693 metre flyover worth Rs 33.04 crore as an epitome of the dedication shown by the MMRDA team and appointed contractor despite difficulties faced due to the Covid pandemic."

***पूर्व द्रुतगती महामार्गावरील अंधेरी-घाटकोपर जंक्शन येथे दक्षिण बाऊंड उड्डाणपूल आजपासून वाहतुकीसाठी खुला***

मुंबई, दि. 9 नोव्हेंबर 2020 : पूर्व द्रुतगती महामार्गावरील अंधेरी-घाटकोपर जंक्शनवर नव्याने बांधण्यात आलेल्या दक्षिण बाऊंड उड्डाणपुलाचे उद्घाटन आज सोमवारी पर्यावरण आणि पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे, नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि संसद सदस्य, आमदार, नगरसेवक, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. आर. ए. राजीव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या जंक्शनवरील गर्दी कमी करण्यासाठी तसेच मुंबई व घाटकोपरकडे जाणारी वाहतूक वेगळी करण्यासाठी 12 मीटर रुंदीचा हा उड्डाणपूल प्रस्तावीत करण्यात आला होता.

मुंबईहून ठाण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांना तीन लेन उड्डाणपूल होता, तथापी, त्यांना अंधेरी-घाटकोपर जंक्शनवर मोठ्या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे वाहतुकीची ही कोंडी सोडवण्यासाठी एमएमआरडीएने (मुंबईच्या दिशेने) तीन लेन नवीन उड्डाणपुलाचे काम सुरू केले. आता नव्याने तयार केलेला उड्डाणपूल वाहतुकीसाठी आजपासून खुला झाल्याने आता प्रवाशांना दोन्ही दिशेने सुरळीत व सुरक्षित वाहतुकीचा अनुभव घेता येईल. यामुळे ठाण्याहून मुंबईला जाण्यासाठी चांगली कनेक्टिव्हीटी मिळणार आहे.

उड्डाणपुलाचे काम मेसर्स एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि मेसर्स काशेक इंजिनिअर्स प्रा. लि. यांना देण्यात आले होते. निविदेची किंमत ही 33.04 कोटी रुपये होती. उड्डाणपुलाची एकूण रुंदी 12 मीटर आणि लांबी 693 मीटर आहे. उड्डाणपुलाच्या सुपरस्ट्रक्चरमध्ये स्टील गर्डर, आरसीसी स्लॅब आणि पीएससी - 1 गर्डरचा टिपिकल स्पॅन आरसीसी डेकस्लॅब ऑब्लिगेटरी स्पॅनशी एकत्रित आहे. एमएमआरडीएच्या माहितीनुसार या प्रकल्पातून कुशल कामगारांसाठी एकूण 30 हजार 036 मनुष्यदिवस तर अकुशल कामगारांसाठी 36 हजार 875 मनुष्यदिवस रोजगाराची निर्मिती झाली. या प्रकल्पातून कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनावर सुमारे 12.8 कोटी रुपये खर्च झाले.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. आर. ए. राजीव म्हणाले की, " हा उड्डाणपूल आज वाहतुकीसाठी खुला होत असल्यामुळे एमएमआरडीएमार्फत महानगरातील वाहतुकीच्या सुलभतेमध्ये अजून एक महत्वाचे योगदान दिले जात आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावरील विद्यमान अंधेरी- घाटकोपर जंक्शन हे सर्वात जास्त वाहतुकीच्या वर्दळीच्या स्थानापैकी एक होते. या नवीन उड्डाणपुलामुळे वाहतूक विभागली जाईल आणि त्यामुळे जंक्शनवरील वाहतुकीची वर्दळ आणि कोंडी कमी होईल."

ते पुढे म्हणाले की, "प्रवाशांना सुलभ आणि सुरक्षित ड्राइव्ह करण्यासाठी दररोज हा उड्डाणपूल व्यापकपणे वापरला जाईल. यामुळे वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊन वाहनचालकांना मोठा दिलासा मिळेल असा विश्वास आहे. 693 मीटर लांबीचा हा उड्डाणपूल 33.04 कोटी रुपये किमतीमध्ये पूर्ण करण्यात आला. कोविड साथीच्या काळात अनेक अडचणी येत असतानाही एमएमआरडीए टीम आणि नियुक्त कंत्राटदाराने समर्पणाने केलेल्या कामाचे हे प्रतीक आहे."







